# Sakal

## 11 cos get approval for payment banking

**Date: 21/08/2015 | Edition: Mumbai | Page: 05 | Source: Bureau | Clip size (cm): W: 18 H: 11**

**Clip: 1 of 1**


# पेमेंट बँकेसाठी ११ कंपन्यांना मंजुरी

मुंबई, ता. २० (पीटीआय) : रिझर्व्ह बँकेने अकरा कंपन्यांना पेमेंट बँक स्थापन करण्यासाठी तत्त्वतः मंजुरी बुधवारी (ता. १९) दिली. यात रिलायन्स इंडस्ट्रीज, आदित्य बिर्ला नूवो, व्होडाफोन आणि एअरटेल या बड्या कंपन्यांचा समावेश आहे.

मंजुरी देण्यात आलेल्या अन्य कंपन्यांमध्ये टपाल खाते, टेक महिंद्र, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल), चोलामंडलम डिस्ट्रिब्यूशन सर्व्हिसेस, फिनो पेटेक, सन फार्माचे दिलीप शांतिलाल संघवी आणि पेटीएमचे विजय शेखर शर्मा यांचा समावेश आहे. तत्त्वतः मंजुरी अठरा महिन्यांसाठी वैध असणार आहे. या काळात कंपन्यांना रिझर्व्ह बँकेने आखून दिलेले नियम आणि अटींची पूर्तता करावी लागेल, असे रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे. पेमेंट बँकेमुळे मोबाईल कंपन्या, सुपरमार्केट साखळ्या आणि अन्य संस्थांना व्यक्ती अथवा छोट्या उद्योगांना सेवा देता येणार आहे. पेमेंट बँकेची रचना वेगळ्या पद्धतीने केली जाणार आहे. त्यांना ठेवी स्वीकारणे, दुसरीकडे पैसे पाठविणे, इंटरनेट बँकिंग आणि अन्य विशेष सेवांपुरते मर्यादित ठेवण्यात आले आहे.

### पेमेंट बँकांच्या कामाचे स्वरूप

- लोकांकडून पैसे, ठेवी स्वीकारणे (मर्यादा १ लाख)
- एटीएम व डेबिट कार्ड देणे (क्रेडिट कार्ड वगळता)
- पैसे देणे, तसेच हस्तांतरित करणे
- म्युच्युअल फंड, तसेच विमा योजना विकणे
- फोन रिचार्ज, बिल भरणा, बस अथवा रेल्वे बुकिंग

अशा प्रकारच्या बँकांमुळे बँकिंग व्यवस्थेत आणखी पैसे येण्यास मदत होईल, तसेच ग्रामीण भागातील जनतेपर्यंत बँका पोचतील. स्टेट बँकेसह अनेक बँकांना ग्रामीण भागात पोचायचे आहे. पेमेंट बँकांमुळे त्यांचे हे प्रयत्न प्रत्यक्षात उतरतील.

-अरुण जेटली,
केंद्रीय अर्थमंत्री


स्त्री/पुरुष तसेच स्थूल व्यक्ती
बसल्या बसल्या विनाकष्टाच
पेडल एक्सरसाइज